# घोषित आणि अघोषित आणीबाणी

**डॉ.यशवंत मारुती चव्हाण सहकारभूषण एस.के.पाटील कॉलेज कुरुंदवाड**

**इमेल : yashwantchavan37@gmail.com मोबाईल क्र.: 9850849308**

---

**प्रस्तावना-**

मराठीतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गझलकार सुरेश भट यांनी कालातीत असे सत्य आपल्या लेखणीतून, एका गझले मधून उभे केले आहे. जी पुढे सन 1979 मध्ये लेखक अरुण साधू यांच्या 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक' या दोन कादंबऱ्यावर आधारित जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या 'सिंहासन' या चित्रपटांमध्ये अभिनेता निळू फुले यांच्या वरती चित्रीत करण्यात आली आहे. ती गझल अशी,

उषःकाल होता होता, काळ रात्र झाली
अरे ,पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली
आम्ही चार किरणांची ही आस का धरावी
जे कधीच नव्हते त्याची वाट का पहावh
कसा सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली
तेच घाव करिती फिरुनी ह्या नव्या कट्यारी
तेच दंश करती आम्हा साप हे विषारी!
आम्ही मात्र ऐकत असतो आमुची खुशाली!
तिजोऱ्यात केले त्यांनी बंद स्वर्ग साती !
आम्हावरी संसाराची उडे धूळ माती
आम्ही ती स्मशाने ज्यांना, प्रेत ही न वाली
अशा कशा ज्याने त्याने गाडल्या उमेदी?
असा कसा जो तो येथे होत असे खरेदी?
ह्या अपार दुःखाची ही चालली दलाली!
उभा देश झाला आता एक बंदिशाला
जिथे देवकीचा पान्हा दुधाने जळाला
कसे पुण्य दुर्दैवी अन पाप भाग्यशाली
धुमसतात अजूनही विझल्या चितांचे निखारे!,
अजुन रक्त मागत उठती वधस्तंभ सारे!
आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली!

सध्या आपल्या भारतीय राज्यघटनेचा अमृतकाल सुरू आहे. त्यानिमित्ताने वरील गझलेची प्रकर्षाने आठवण व्हावी अशी सभोवतालची परिस्थिती आहे. सत्तेतल्या सरकारने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव दिमाखाने साजरा केला, परंतु संविधानाचा अमृतमहोत्सव तितक्याच दिमाखाने साजरा करताना दिसत नाही. एकूणच लोकशाही आणि संविधानमूल्ये सत्तापक्ष आपल्या वर्तनाने मोडीत काढत आहे असे एकूण चित्र दिसत आहे. म्हणूनच सध्या अघोषित आणीबाणी सुरु आहे का ? असा प्रश्न मनात येतो. मग घोषित आणि अघोषित आणीबाणी यांची मीमांसा करणे आवश्यक वाटते. या 75 वर्षात आपल्या देशाने भारतीय संविधानाच्या आधारे केलेली वाटचाल आपणासमोर आहे. भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया आपणा सर्वांनाच परिचित आणि आपल्या अभ्यासात असणारी गोष्ट आहे. 1947 ला देश स्वतंत्र झाल्यानंतर 26 नोव्हेंबर 1949 ला आपण भारतीय राज्यघटनेचा म्हणजे संविधानाचा स्वीकार आपण केला. त्यानंतर गेल्या 75 वर्षात भारतीय राज्यघटनेवर आधारित आपल्या देशाची वाटचाल सुरू आहे. मध्यंतरी काही चढउतार झाले. परिस्थितीनुरूप काही बदल घटनेमध्ये करावे लागले ते आपण केले. संविधानाच्या मार्गाने काही अप्रिय घटना या देशांमध्ये घडल्या, त्याच्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो, तो इंदिरा गांधींनी पुकारलेल्या आणीबाणीचा. इंदिरा गांधींनी पुकारलेली आणीबाणी त्यातून निर्माण झालेले संघर्ष, अनेक सामाजिक आणि राजकीय नेत्यांना भोगावा लागलेला तुरुंगवास, त्यातून जनसामान्यांची निर्माण झालेली मानसिकता या सर्वांचा परिपाक म्हणून इंदिरा गांधींना १९७७ मध्ये आपली सत्ता गमवावी लागली. हा सर्व इतिहास आपल्या समोर आहे.

26जून 1975 रोजी सकाळी सहा वाजता अचानक तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मंत्रिमंडळाची बैठक बोलावली आणि मध्यरात्रीपासूनच सुरू झालेल्या आणीबाणीची केवळ औपचारिक मान्यता घेऊन त्यांनी आकाशवाणीवरून ही बातमी सर्व राष्ट्राला दिली. ती देताना त्या म्हणतात, ' राष्ट्रपतींनी आणीबाणी जाहीर केली आहे पण त्यामुळे हवालदिल होण्याचे काहीच कारण नाही मी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून भारतातील सर्वसामान्य स्त्री-पुरुषांसाठी जी प्रगतशील पावले उचलली त्याविरुद्ध सतत आणि व्यापक प्रमाणावर कटकारस्थाने सुरू आहेत. फुटीरतावादी आणि धर्मांधशक्ती देशाची एकात्मता नष्ट करू पाहत आहेत.

हा काही व्यक्तिगत प्रश्न नाही, मी पंतप्रधान राहणार की नाही हे महत्त्वाचे नाही, पण मला असे आशा आहे की परिस्थिती लवकरच सुधारेल आणि आपल्याला आणीबाणीचा आदेश मागे घेता येईल.'(गांधी नंतरचा भारत- रामचंद्र गुहा पृष्ठ क्र. 574) असे जरी त्यांनी म्हटले असले तरीही आणीबाणी जवळजवळ 21 महिने म्हणजे मार्च 1977 पर्यंत सुरू राहिली. जितक्या अनापेक्षितपणे जून1975 मध्ये आणीबाणीची घोषणा करण्यात आली तितक्याच अनापेक्षितपणे 18 जानेवारी 1977 ला इंदिरा गांधींनी आकाशवाणीवरून निवडणुकीची घोषणा केली. हाही संपूर्ण राष्ट्राला एकप्रकारे आश्चर्याचा धक्काच होता. पण या 21 महिन्याच्या कालावधीमध्ये स्वातंत्र्याचा संकोच झाला अर्थात ही लागू केलेली आणीबाणी भारतीय संविधानाच्या/ घटनेच्या अठराव्या भागात आणीबाणी विषयक ज्या तरतुदी आहेत त्यानुसार लागू करण्यात आली होती. कलम 352 ते 360 या नऊ कलमांमध्ये आणीबाणी लागू करण्याविषयीच्या तरतुदी समाविष्ट आहेत. 'मूळ 352 व्या कलमानुसार युद्धामुळे व बाह्य आक्रमणामुळे किंवा अंतर्गत अशांततेमुळे भारताच्या व भारतातील एखाद्या प्रदेशाच्या संरक्षणाला धोका आणणारी गंभीर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे अशी राष्ट्रपतीची खात्री झाल्यास तो एक जाहीरनामा काढून आणीबाणीची घोषणा करू शकतो- अशी तरतूद होती.' (भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण- भा.ल.भोळे पृष्ठ क्र. 354) पण पुढे '1978 मध्ये जनतापक्षाच्या सरकारने 44 व्या घटना दुरुस्तीद्वारे मंत्रिमंडळाने लेखी स्वरूपात कळवल्यानंतरच राष्ट्रपती आणीबाणी जाहीर करू शकेल' अशी तरतूद केली (भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण भा.ल.भोळे - पृष्ठ-क्र. 356) त्यामुळे त्यानंतर आणीबाणी जाहीर करण्याचा प्रसंगच उद्भवलेला दिसून येत नाही. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की इंदिरा गांधींनी राष्ट्रपतींना केवळ शिफारस केली आणि राष्ट्रपतींनी तिला मान्यता दिली (भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण भा.ल.भोळे पृष्ठ क्र. 356) आणीबाणी लागू करण्यापूर्वी मंत्रिमंडळाची आवश्यक असणारी बैठक व मान्यता झालेली नव्हती. उलट राष्ट्रपतींनी लागू केलेल्या आणीबाणीला नंतर मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली होती. इंदिरा गांधींनी इतक्या घाईगडबडीने हा निर्णय का घेतला? त्याच्या मागची कारणमीमांसा काय होती ? याचा थोडक्यात आढावा घेणे येथे उचित ठरेल.

1971 मध्ये झालेल्या निवडणुकीत सरकारी अधिकारी आणि यंत्रणेचा गैरवापर केल्याचा आरोप अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींच्यावरती ठेवला होता आणि लोकसभा किंवा विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी त्यांना सहावर्षासाठी बंदी घालण्यात आली होती. (अर्थात 12 जूनला दिलेल्या या निकालावर अपील करण्यासाठी त्यांना 20 दिवसाची मुदतही देण्यात आली होती.)

विसाव्या शतकातील सर्वात महाभयंकर म्हणून ओळखला जाणारा दुष्काळ 1972- 73 आणि 73- 74 मध्ये पडला होता. जगभर त्याचे पडसाद उमटले होते ,अर्थातच भारतामध्ये गरिबी आणि बेरोजगारी चरमसीमेला पोहचली होती. खेडेगावातून अनेक लोक शहरात स्थलांतरित होत होते. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेवरचे वेतन अत्यल्प होते. निकृष्ट गहू आणि मिलो यांना जनता वैतागली होती. या दुष्काळ टंचाईला आणखीन एक पार्श्वभूमी होती ती भारत-पाक युद्धाची. इंदिरा गांधींनी बांगला देशाची निर्मिती केली होती ,त्यामुळे अमेरिकेला भारताला धडा शिकवायचा होता. 'अमेरिकेच्या सातव्या आरमाराला आपण भीक घालत नाही', असे उद्गार काढून इंदिरा गांधींनी पाकिस्तानवरची चढाई चालूच ठेवली होती.(ज्वालामुखीच्या तोंडावर- लेखक- कुमार केतकर पृष्ठ क्र. 197) साहजिकच परकीय राष्ट्र ही विशेषतः अमेरिका भारताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत होती.यातच जयप्रकाश नारायण यांनी 1974 मध्ये केलेली 'संपूर्ण क्रांतीची' घोषणा, त्यामुळे नोकरशाहीचा न मिळणारा पाठिंबा, याबरोबरच बांगलादेशातून येणारे निर्वासितांचे लोंढे या सर्वांमुळे अगोदरच अडचणीत आलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला अधिकच गर्तेत ढकलले गेले होते. देशाच्या प्रत्येक राज्यातून केंद्र सरकारकडे अन्नधान्याची मागणी होत होती. त्यातच पाश्चिमात्य देशाने मुख्यतः अमेरिकेने हात आखडते घेतले होते. अशा सर्व अस्थिर परिस्थितीमध्ये देशांतर्गत होत असणारे उठाव त्यामुळे एका अराजकतेच्या तोंडावर देशातील परिस्थिती उभी राहिली होती. भारत त्यावेळेला बऱ्याच अंशी आयात होणाऱ्या वस्तूंवर अवलंबून होता. उदाहरणार्थ भारताची खनिज तेलाची गरज ही आयात तेलावरच अवलंबून होती. त्यातच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील खनिज तेलाच्या किमती वाढल्या त्यामुळे स्वातंत्र्यानंतर प्रथमच एका फटक्यात 30 टक्क्यांनी महागाई वाढली. या सर्व परिस्थितीमुळे भारतातला कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीय कर्मचारी हा या महागाईने पूर्णपणे मोडून पडला. या सगळ्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधींना कोंडीत पकडण्याची संधी विरोधक सोडायला तयार नव्हते. या सर्वपरिस्थितीची नेमक्या शब्दात कुमार केतकर आणि मांडणी केली आहे ती अशी,' सरकारशी संपूर्ण असहकार करा, विद्यार्थ्यांनी शाळा बंद कराव्यात, कामगारांनी कारखाने बंद करावेत, दिल्लीतील पंतप्रधानाच्या निवासस्थानाला घेरावा घालावा, लाठीमार होईल, पण घाबरू नका. पांगू नका. अटकसत्र सुरू होईल तुरुंग भरा, गोळीबार होईल, हुतात्मे व्हा. किती गोळ्या पोलीस मारतील? आणि पोलिसांनी व सैन्याने तरी सरकारचे अनैतिक आदेश का पाळावेत? त्यांनीही तसे आदेश पाळायला नकार दिला तर लोकांची चळवळ, सरकारला शासन चालवणे मुश्किल करून टाकेल.' अशा प्रकारचे आवाहन विरोधात असणाऱ्या नेत्यांकडून केले जात होते' (ज्वालामुखीच्या तोंडावर कुमार केतकर पृष्ठ क्र. 202)अशा एकूणच अराजक सदृश्य परिस्थितीमध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणीची घोषणा केली होती.

**आणीबाणीचे परिणाम**

कोणत्याही देशात अथवा राज्यात आणीबाणी पुकारल्या नंतर राज्याच्या कार्यपालिकेचे किंवा उच्च न्यायालय सोडून इतर न्यायालयाची कोणतीही सत्ता राष्ट्रपती स्वतःकडे घेऊ शकतात आणि राज्याच्या विधिमंडळाचे अधिकार संसदेच्या अधिकारितेत

संसद चालवील असे जाहीर करू शकतो. (भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण- भा.ल.भोळे पृष्ठ क्र. 310) राज्यातील संविधानिक यंत्रणा कोसळण्याच्या प्रसंगी आणीबाणी घोषित करण्याचा हा केंद्राचा अधिकार असतो. आणीबाणी घोषित केल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो. सेंसॉरशिप लागू होते,राष्ट्राच्या अथवा राज्याच्या सुरक्षिततेच्या कारणाखाली विरोधी पक्षाच्या नेत्यांना अथवा कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबले जाते. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यावर गदा येते. असे अनेक परिणाम आणीबाणीमुळे होत असतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे आणीबाणीमुळे राष्ट्रीय काँग्रेसचे सरकार 1977 च्या निवडणुकीत पराभूत झाले आणि जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले मात्र तेही अल्पकाळच राहिले. मोरारजी देसाईच्या नेतृत्वात सत्तेवर आलेले सरकार अवघ्या सव्वा दोन वर्षात कोसळले आणि पुन्हा इंदिरा गांधींच्या नेतृत्वातील काँग्रेसने बहुमत मिळवून 1979 मध्ये पुन्हा राष्ट्रीय काँग्रेस सत्तेत आली. जनता सरकार पडल्यानंतर त्यातून फुटून भारतीय जनता पार्टीची म्हणजेच भाजपची स्थापना झाली. एकाकी पडलेल्या समाजवादी पक्षाला आजतागायत स्वतःला सावरता आले नाही. असे एकूण भारतीय राजकारणावर आणीबाणीचे झालेले परिणाम आपणास सांगता येतील. 1975 मध्ये इंदिरा गांधींनी घोषित केलेल्या या आणीबाणीच्या संदर्भात अलीकडच्या काळात खूप लिहिले बोलले गेले आहे. परंतु तत्कालीन परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करून सत्यासत्यता पडताळणे आजच्या परिस्थितीत आवश्यक झाले आहे. केवळ आणीबाणीमुळेच लोकशाही हक्कांचे आकुंचन होते हे ही सर्व अर्थाने खरे नाही. एकूणच भारतीय संविधानाच्या परस्परविरोधी वाटणाऱ्या अनेक कलमांचा अभ्यास करून योग्य प्रकारे राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती हाताळणे हे त्या त्या वेळी सत्तेत असणाऱ्या पक्षाचे आणि ते योग्य रीतीने कारभार करतील याच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या विरोधी पक्षाचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

**सध्याची अघोषित आणीबाणी**

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी घोषित केलेली आणीबाणी आणि त्यामुळे स्वातंत्र्यानंतर देशामध्ये निर्माण झालेली अभूतपूर्व परिस्थिती याचा लेखाजोखा आजपर्यंत मांडला गेला आहे. त्यावेळेला विरोधात असणारा जनसंघ म्हणजेच आत्ताची भारतीय जनता पार्टी सत्तेत आहे 2014 पासून सत्तेत आल्यापासून ज्यापद्धतीने भारतीय राजकारण, समाजकारण आणि आर्थिक परिस्थिती हाताळली जात आहे ती पाहता देशात अघोषित अशी आणीबाणी सुरू आहे की काय? अशी शंका आल्याशिवाय राहत नाही. याचा ऊहापोह आपणाला पुढील घटना – प्रसंगांच्या आधारे करता येईल.

सद्य परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करणारे बंगळूरस्थित अझीम प्रेमजी विद्यापीठात स्कूल ऑफ पॉलिसी अँड गव्हर्नन्स हा विषय शिकवणारे वकील आणि लेखक अरविंद नरेन यांचे 'इंडियाज अनडिक्लेअर्ड इमर्जन्सी' पुस्तक सरकारच्या या अघोषित आणीबाणी चा खरा चेहरा समोर आणण्याचा प्रयत्न करणारे आहे ते या पुस्तकात आज परिस्थिती किती बदलली आहे, विरोधकांचा आवाज कसा दाबला जात आहे, संसदेत प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना निलंबित केले जात आहे त्यांच्या मागे चौकशीचा सिसेमिरा लावला जात आहे. देशप्रेम आणि देशभक्तीचे डोस विविध पातळ्यावर ज्यापद्धतीने पाजले जात आहेत ते पाहता सत्ताधाऱ्याच्या विरोधात शब्द उच्चारणे म्हणजे देशद्रोह झाला आहे. याची जाणीव ते सदर पुस्तकात करून देतात.(प्रसाद मोकाशी -लोकसत्ता 13 जानेवारी 2024 –विशेष लेख) दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांच्यावर करण्यात आलेले आरोप या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत हे विद्यापीठ म्हणजे विद्रोहाचे केंद्र असून येथे अतिरेकी विचार जोपासला जातो या आरोपाखाली उमर खालिद या विद्यार्थ्याला झालेली शिक्षा ,भोगावा लागलेला तुरुंगवास सर्वज्ञात आहे. यातूनच कन्हैया कुमारसारख्या तत्कालीन विद्यार्थ्यांना झालेला त्रासही आपणास विदित आहे. याचबरोबर तामिळनाडूतील रोहित विमुलाची आत्महत्या ही यानिमित्ताने आपणास आठवावयास हवी. विद्यार्थ्यांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आवाज उठवू नये यासाठी केली जाणारी गळचेपी या उदाहरणातून दिसून येते .असे असले तरी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ असो अथवा इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांची सत्तेविरोधातली निदर्शने सातत्याने चालू असतात हे महत्त्वाचे आहे.

दुसरे उदाहरण म्हणजे 2018 मध्ये महाराष्ट्रातील भीमा कोरेगाव येथील दंगलीचे देता येईल येथे जमलेल्या दलित बांधवांवर झालेल्या हल्ले त्यांच्यावर दाखल केले गेलेले गुन्हे त्याच बरोबर भीमा कोरेगावच्या दंगलीच्या अगोदर पुणे येथे झालेल्या एल्गार परिषदेमध्ये सहभागी झालेल्या विचारवंतांना झालेली अटक त्यांच्यावर अर्बन नक्षली म्हणून दाखल केलेले गुन्हे आणि त्यांना घडलेला तुरुंगवास या सर्व गोष्टी व्यक्ति स्वातंत्र्याच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळा घोटणाऱ्याच तर आहेतच पण त्याचबरोबर अघोषित आणीबाणीच्या उद्घोष करणारे आहेत.

तिसरे उदाहरण म्हणजे कोविड 19 च्या नावाखाली संसद आणि संसदीय समितीच्या कामकाजावर कमालीची मर्यादा घालण्यात आली होती. केवळ चार तासाच्या नोटीससह देशव्यापी लॉकडाऊन लागू केले होते. एका वर्षाच्या कालावधीत संसद फक्त 24 दिवसच बसली. विरोधकांनी वारंवार विनंत्या करून ही संसदेचे कामकाज घेण्यात आले नाही. या शिवाय जितके दिवस संसदेचे कामकाज चालले त्याकाळात लोकसभेमध्ये असणारे प्रचंड बहुमत आणि विरोधी पक्षांच्या पाठिंब्याने राज्यसभेत असलेल्या बहुमताच्या आधारे संसदेत कोणत्याही पुरेशा चर्चेशिवाय विधायके मंजूर करून घेण्यात आली. उदाहरणार्थ घटनेतील कलम 370 आणि 35 A रद्द करण्याचे आणि जम्मू-काश्मीरची पुनर्रचना करण्याची विधायक, जी. एस. टी लागू करण्याबाबतचा निर्णय संसदेने एप्रिल ते नोव्हेंबर 2022 या कालावधीमध्ये 16 विधेयक मंजूर केली आहे त्यापैकी लोकसभेमध्ये सहा व राज्यसभेमध्ये पाच आणि दोन्ही सभागृहांनी मिळून पाच विधेयके मंजूर केली ही सर्व विधेयके घाईगडबडीत आणि सखोल चर्चेशिवाय मंजूर करण्यात आली. या

मध्ये गुन्हेगारी संबंधीची तीन विधेयके १८६० चा इंडियन पिनल कोड चे भारतीय न्याय साहिंता १८७२ चा इंडियन इविडंस ॲक्ट चे भारतीय साक्ष साहिंता, क्रिमिनल प्रोसिजर कोड चे भारतीय नागरिक सुरक्षा साहिंता असा जो बदल केला यांचा उल्लेख करावा लागेल या शिवाय नुकतेच हिवाळी अधिवेशनात तरुणांनी लोकसभागृहात मारलेल्या उडया त्यामुळे विरोधकांनी सभागृहाच्या सुरक्षेसंबंधी प्रश्न विचारल्यामुळे 141 खासदारांचे केलेले निलंबन किंवा संसदेत सरकारपक्षाला अडचणीचे वाटणा़ारे प्रश्न विचारणाऱ्या खासदारांचे निलंबन ;k सर्व गोष्टी ह्या अघोषीत आणीबाणीची लक्षणेच म्हणता येतील.

घोषित आणीबाणीमध्ये उच्च व सर्वोच्च न्यायालय स्वतंत्र राहू शकतात. कारण न्यायालय ही स्वायत्त संस्था असून या न्यायपालिका लोकशाहीच्या आधार आहेत खरंतर संसदेने संमत केलेले कायदे जर संविधानाच्या तरतुदीशी सुसंगत नसतील तर ते असंविधानिक ठरविण्याचा अधिकार न्यायालयांच्याकडे आहे मात्र अलीकडच्या काळात न्यायव्यवस्थाही केंद्रसरकारचा एक भाग झाल्याचे दिसून येते आहे . काही वादग्रस्त निकाल या कालखंडात झाले आहेत. उदाहरणार्थ रामजन्मभूमी- बाबरी मशीद वाद, नागरिकत्व सुधारणा कायदा ¼सीएए½ आणि जम्मू काश्मीर पुनर्रचनाचा कायदा या शिवाय काश्मीरला विशेष दर्जा देणारे 370 हे कलम हटवणे या गोष्टी मध्ये न्यायालयाने ज्या पद्धतीने निकाल दिले आहेत ते सामान्य नागरिकांच्या मनात व विधीतज्ञांच्या मनामध्ये शंका उत्पन्न करणारे आहेत.

सध्याच्या परिस्थितीत सरकारवर टीका करणाऱ्या सरकारला, विरोध करणाऱ्या,सरकारचा निषेध करणाऱ्या नागरिकांच्या लोकशाही हक्कांची सर्रास पायमल्ली होताना दिसत आहे. सरकारविरोधात आंदोलन करणाऱ्यांना देशद्रोही, दहशतवादी किंवा शहरी नक्षलवादी असे संबोधले जाते. उदाहरणार्थ गतवर्षी दिल्लीच्या सीमेवर हरियाणा, पंजाब मधील शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन त्यामध्ये त्यांना खालिस्तानवादी, देशद्रोही, आंदोलन जीवी अशा प्रकारची संबोधने लावण्यात आली. आज रोजी दिल्लीच्या सीमेवर पंजाब आणि हरियाणा मधील शेतकऱ्यांची निदर्शने चालूच आहेत, परंतु त्याच्याकडे सरकार पूर्णपणे दुर्लक्ष तरी करत आहे किंवा त्यांना दिल्लीत येण्यापासून रोखण्याचे सर्व प्रकारचे उपाय करत आहे परंतु एवढ्यावरच न थांबता त्यांच्यावर अश्रुधुरांच्या निळकंडया फोडण्यात येत आहेत. छऱ्यांचे बार काढण्यात येत आहेत. त्यात अनेक शेतकरी जखमी होत आहेत. रस्त्यावर अनेक प्रकारची बॅरिकेट्स लावण्यात येत आहेत, खिळे रोवण्यात येत आहेत अशा प्रकारे त्यांचा आंदोलन करण्याचा हाक्कच हिरावून घेतला जातो आहे आणि आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला जातो आहे हेही एक प्रकारे अघोषित आणीबाणीचेच लक्षण आहे.

अघोषित आणीबाणीचे आणखी एक उदाहरण म्हणून सध्या विरोधी पक्षनेत्यांना कशाप्रकारे त्रास दिला जातो आहे ,त्यासाठी केंद्रीय संस्थाचा वापर कशा पद्धतीने केला जात आहे राष्ट्रीय तपास संस्था (NIA) केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI) अंमलबजावणी संचालनालय (ED) आणि आयकर विभाग यासारख्या केंद्रीय एजन्सींचा वापर करून विरोध नेत्यांना किंवा सत्ताधारी पक्षातल्या परंतु सरकारच्या धोरणाविरुद्ध किंवा त्यांच्या निर्णयाविरुद्ध बोलणाऱ्या नेत्यां विरुद्धसुद्धा या एजन्सींच्यामार्फत कारवाई केली जात आहे .याची अनेक उदाहरणे आपण सध्या अनुभवत आहोत. त्यांच्याच पक्षातले माजी राज्यपाल असणारे सत्यपाल मलिक यांनाही त्यांनी अशा प्रकारच्या चौकशीमध्ये अडकवलेले आपणास दिसून येते.

खरे तर लोकशाहीचा चौथा खांब म्हणून आपण माध्यमांचा उल्लेख करतो पण सध्याच्या काळात काही ठराविक प्रसारमाध्यमे सोडली तर इतर सर्व माध्यमे, मग प्रिंट मीडिया असो अथवा डिजिटल मीडिया असो ही सर्व सत्तेची गुलाम बनली आहेत. मुख्यत: मीडियाचा एक मोठा वर्ग सरकारचे समर्थक असलेल्या कार्पोरेटने त्यांच्या ताब्यात घेतला आहे. सरकारवर टीका करणाऱ्या पत्रकारांना व्यक्तींना एकतर अटक केली जाते किंवा ते ज्या प्रसार माध्यमांमध्ये काम करत होते तेथून त्यांना काढून तरी टाकले जाते किंवा ते प्रसारमाध्यम तरी विकत घेतले जाते हे आपणास रविशकुमार, अजितअंजुम, निखिल वागळे यासारख्या कितीतरी पत्रकारांच्या बाबतीत दिसून येते.

खरे तर स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या कल्पनेतून साकारलेले पंचायत राज्य हे लोकशाही मध्ये सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे प्रमुख साधन ठरले पण सध्याच्या काळात सत्तेचे केंद्रीकरण सुरू आहे. केवळ काही ठराविक व्यक्तींच्या हातात संपूर्ण सत्ता केंद्रित झालेली दिसून येते. केंद्रीय मंडळातील इतर कोणत्याही मंत्र्यांची नावे सामान्य माणसांना साधी माहीत सुद्धा नाहीत. प्रत्येक ठिकाणी एकच चेहरा सर्वांना दिसत असतो. हे वास्तव आपणास नाकारता येत नाही.

अगदी अलीकडे चंदीगडच्या महापौर पदाच्या निवडणुकीत उपस्थित निवडणूक अधिकारी अनिल मसिह यांनी आठ मतपत्रिका बाद ठरवून भाजपचा उमेदवार विजयी घोषित केला त्यांचे हे कृष्णकृत्य सर्वोच्च न्यायालयात उघड झाले, त्यावरून निवडणूक अधिकारी आणि सत्ताधीश लोकशाहीवर एक प्रकारे दरोडाच टाकत आहेत हे स्पष्ट झाले आहे.

लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे आबाधीत असते पण अलीकडे निर्भय बनो या अभियानाचे प्रेरक ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे आणि त्यांचे सहकारी यांना पोलीस आयुक्तांनी कशा प्रकारे अडवून ठेवले त्यांना कशा प्रकारच्या नोटिसा दिल्या गेल्या, पोलिसांनी केलेल्या सर्व सूचनांचे पालन केले असून सुद्धा त्यांना पाच ते सहा तास एकाच ठिकाणी थांबून ठेवण्यात आले सभेच्या ठिकाणी ते जाणारच नाहीत अशीच व्यवस्था जणू पोलीस अधिकारी करत होते अगदी संयमाचा कडेलोट झाल्यानंतर ज्यावेळेला निखिल वागळे सभेसाठी जाऊ लागले त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी कशा प्रकारचे अडथळे आणले हे सर्व सोशल मीडियामध्ये आपणास पहावयाला मिळाले आहे .खरे तर पोलीस यंत्रणेने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण केले पाहिजे परंतु तसे होताना दिसत नाही. यासर्व गोष्टी सत्ताधीशांच्या आशीर्वादानेच होत आहेत का ? असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही.

आणि म्हणूनच ही अघोषित आणीबाणी आहे का ? असा प्रश्न उपस्थित होतो. ;kf'kok; राज्याराज्यात अनेक घटना घडत आहेत अगदी उल्लेख करायचा तर सुवर्णपदक विजेत्या कुस्तीगिर महिलांवर झालेला अन्याय, मणिपूरमध्ये स्त्रियांची निवस्त्र करून निर्लज्जपणाने काढलेली धींड ही घटना तर लोकशाहीला काळीमा फासणारीच आहे . याशिवाय मॉबलिंचिंगच्या होणाऱ्या घटना, दलितांच्यावर होणारे अन्याय, देवळासारख्या ठिकाणी होणारे लहान मुलींवरील बलात्कार, आंदोलक शेतकऱ्यांच्या अंगावर चढवलेल्या गाड्या, निवडणूक रोख्यांबाबत सरकारने घेतलेली आडमुठ्ठी भूमिका आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल, सरकारी संस्थांची, मालमत्ता यांची कवडी मौलाने सुरु आहे काही मोजक्याच भांडवल दरांना विकल्या जाणाऱ्या सार्वजनिक मालमत्ता त्यामुळे देशावर आर्थिक आणीबाणी लादली जाण्याची शक्यता नाकारता येते नाही. अशी एक ना अनेक उदाहरणे जी लोकशाहीची पायमल्ली करणारी आहेत. ती आपणास सांगता येतील. परंतु असे असले तरी यासर्व परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी सर्व सामान्य माणसांनी याचा गांभीर्याने विचार करायला हवा. लोकशाहीची मूल्ये अबाधीत राहावीत यासाठी आपल्याला मिळालेल्या अधिकारांचा आणि कर्तव्यांचा सचोटीने वापर केला पाहिजे. संपूर्ण देशात सर्वसामान्य जनता आनंदाने राहील, नांदेल अशी व्यवस्था आपणच निर्माण केली पाहिजे. यासाठी कॉम्रेड धनाजी गुरव यांनी आपल्या, 'लढून मिळवलेली लोकशाही टिकवण्यासाठी ' या छोटेखानी पुस्तकात संघाच्या सांस्कृतिक राजकारणाचा पराभव आणि निवडणुकीत सत्ताधारी भाजपाचा पराभव करण्यासाठीच्या रणनीतीचा विचार साकल्याने मांडला आहे. ते म्हणतात, 'संघाचा सांस्कृतिक राजकारणात पराभव करायचा असेल तर समतेच्या बाजूने उभ्या असलेल्या सांस्कृतिक परंपरांची मूल्य व्यवस्थेच्या पातळीवरील सांस्कृतिक आघाडी उभी करावी लागेल----------- जनसमुहांच्या मनात स्थान असलेली आणि लोकशाही मूल्यव्यवस्थेला पूरक प्रतिके वापरून त्यांच्या सोबत संवादाचे माध्यम निर्माण करावे लागेल साहित्य, चित्रे, रुढी, परंपरा यांचा खुबीने वापर करावा लागेल बौद्ध, जैन, आदिवासी, भटके, विमुक्त, ख्रिश्चन, इस्लाम, शरण- लिंगायत ,महानुभव, वारकरी, फुले- शाहू - आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ ,क्रांतिसिंह नाना पkटील यांच्या परंपरा खुबीने जागवाव्या लागतील. त्यांच्यातील लोकशाही विरोधी विकसित तत्वे 'आपलेपणाने ' दाखवून टाळण्याचा आग्रह करावा लागेल. न्यायव्यवस्था, पोलीस, सैन्य , शिक्षण आणि नोकरशाही यांना संविधानाच्या मूल्यव्यवस्थेकडे नियोजनपूर्वक घेऊन जावे लागेल त्यातूनच संघाचे सांस्कृतिक राजकारण संपेल.' (लढून मिळवलेली लोकशाही टिकवण्यासाठी कॉम्रेड धनाजी गुरव प्रथम आवृत्ती 26 जानेवारी 2024 सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था कोल्हापूर) त्यांचे हे पुस्तक मुळातून वाचले पाहिजे. मी या लेखाच्या सुरुवातीला सुरेश भटांच्या एका गझलचा संदर्भ दिला आहे. जरी आज काळ रात्र आपणां समोर दिसत असली तरीही आपण आशावाद सोडता कामा नये. म्हणूनच सुरेश भटांच्यांच दुसऱ्या एका गझलचा इथे मी उल्लेख करतो.

हे असे आहे तरी पण, हे असे असणार नाही
दिवस अमुचा येत आहे, तो घरी बसणार नाही
हे खरे की आज त्यांनी, घेतले सारेच ठेके
पण उद्या त्यांच्या चितेवर, एकही रडणार नाही
सांगती जे धर्म जाती, बांधती ते रोज भिंती
पण उद्याचा सूर्य काही, त्यामुळे फसणार नाही
छान झाले दांभिकांची, पंढरी उध्वस्त झाली
यापुढे वाचाळ दिंडी, एकही निघणार नाही
आजचे आमचे पराभव, पचवितो आम्ही उद्यास्तव
विजय तो कसला उरावर, जखम जो करणार नाही
हे असे आहे तरी पण, हे असे असणार नाही
दिवस आमचा येत आहे, तो घरी बसणार नाही

कवी सुरेश भट यांनी पेरलेला आशावाद आपणास लोकशाहीची मूल्ये अबाधित ठेवण्यास प्रेरणा देत राहो हीच अपेक्षा व्यक्त करतो.

**संदर्भ ग्रंथ**

१) भोळे भा.ल. 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' आवृत्ती जुलै 2015 पिंपळपरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर
२) गुहा रामचंद्र अनुवाद साठे शारदा 'गांधी नंतरचा भारत' दुसरी आवृत्ती ऑगस्ट 2012 मॅजेस्टिक पब्लिकेशन हाऊस ठाणे
३) ऑस्टिन ग्रॅनव्हील अनुवाद केळकर भारती 'भारताची राज्यघटना राष्ट्राची कोनशिला' डायमंड पब्लिकेशन
४) केतकर कुमार 'ज्वालामुखीच्या तोंडावर' सुधारित आवृत्ती 15 ऑगस्ट 2017 ग्रंथाली प्रकाशन माटुंगा
५) गुरव (कॉम्रेड)धनाजी 'लढून मिळवलेली लोकशाही टिकवण्यासाठी' प्रथम आवृत्ती26 जानेवारी 2024 सम्यक विद्रोही प्रबोधन संस्था कोल्हापूर
६) सप्तर्षी (डॉ.)कुमार 'सत्याग्रही विचारधारा' वर्ष ३३वे अंक दुसरा संपादक मार्च 2024.
७) मोकाशी प्रसाद 'लोकसत्ता मराठी' 13 जानेवारी 2024 विशेष लेख
८) Peenikapparambil Jacob Indian Currents --- --5 July 2021
९) सुरेश भट यांच्या कविता विकिपीडिया वरून घेतल्या आहेत.